| | |
|---|---|
| **Headline:** Rise in stock market participation from North East states | |
| **Source:** Me Marathi | **Date:** 08 September 2015 |

# पूर्वोत्तर राज्यांचा शेअर बाजारातील सहभाग वाढला

▶ **नवी दिल्ली :** पूर्वोत्तरमधील आठ राज्यांचा मागील एका वर्षात शेअर बाजारातील सहभाग वाढला असल्याचे राष्ट्रीय शेअर बाजाराने (एनएसई) म्हटले आहे. वार्षिक आधारावर मागील निवडणुकीनंतर आठ राज्यांमधील लोकांची शेअर बाजारामधील संख्या १८ टक्क्यांनी वाढली असल्याचे एनएसईचे व्यापार विकास प्रमुख रवि वाराणसी यांनी म्हटले आहे. या राज्यांमध्ये गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रमांमुळे ही संख्या वाढल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या राज्यांमध्ये आर्थिक जागरूकता वाढ वण्यासाठी राष्ट्रीय शेअर बाजाराने ७५ कार्यक्रम करण्याची योजना आखली आहे. या आर्थिक वर्षात आसाम आणि त्रिपुरा या ठिकाणी असे २७ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.